पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक- ९
सभावृत्तांत

दि.- ०३/१२/२०१४ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक ०३/१२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे "संत ज्ञानेश्वर महाराज" सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.सुरेखा शंकर गव्हाणे – सभापती
२ मा.काळजे नितीन प्रताप
३ मा.वाबळे संजय मल्हारराव
४ मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६ मा.सुपे आशा रविंद्र
७ मा.गोफणे अनुराधा देविदास
८ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
९ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१० मा.लोंढे शुभांगी संतोष
११ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.आशादेवी दुरगूडे- इ क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.साळवी-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.बी.माने – उपअभियंता (पाणीपुरवठा) मा.श्री.शिंदेएच.एस.उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.- उपअभियंता, मा.श्री. भाऊसाहेब साबळे - उपअभियंता, मा.श्री.व्ही.सी.काळे- कनि**ष्ट** अभियंता - (विदयुत) , मा.श्री.जी.एन.खैरे- स.उ. निरीक्षक, मा.श्री.सी.एम.गावडे, उ.सहा. श्री.इ.बी.पाटील- उप अभियंता, -मा.श्री.सुरेश इप्प्कायल- लेखाधिकारी, मा.एस.डी.लगस- सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.गौड जितसिंग हिरासिंग – मुख्याध्यापक, मा.आर.पी.डामसे (म. नि.किटक नाशक)

**----**

मा.सभापती - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

---

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

**सुचक-** मा. श्रध्दा बाजीराव लांडे **अनुमोदक-** मा. लोंढे शुभांगी संतोष

**मा.सभापती-** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.बॅ.ए.आर.अंतुलेसाहेब यांचे दिनांक २/१२/२०१४ रोजी दुखद निधन झाले तसेच कै.मुरली देवरा- माजी केंद्रीय मंत्री, कै. सितारादेवी – कथ्थक नृत्यांगणा, कै.उदसिंह गायकवाड- माजी खासदार, कै.देवेन वर्मा – कलाकार, कै.अंबादास कांबळे- छायाचित्रकार/पत्रकार, कै.बगाडे संदिप-सामाजिक कार्यकर्ता, कै.नामदेव सोपानराव गवळी- सामाजिक

कार्यकर्ता, कै.सत्यभामा निवृत्ती पाचारणे, कै.शोभा भोसले, यांचे निधन झालेने त्यांना इ प्रभाग समितीच्या वतीने भावपुर्वक् श्रध्दांजली.सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून अर्पण करावी.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) तरतूद वर्गीकरण करणेबाबत. इ क्षेत्रीय कार्यालय, प्रशासन विभागाकडील पत्र.
विषय क्रमांक २) तरतूद वर्गीकरणाबाबत.इ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभाग यांचेकडील पत्र
विषय क्रमांक ३) शालेय भौतिक सुविधे बाबत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्राथमिक शाळा इंद्रायणीनगर मा.मुख्याध्यापिका यांचे पत्र
विषय क्रमांक ४) भोसरीगांव बैलगाडा शर्यत कै.ज्ञानोबा सदाशिव लांडगे प्रसिध्द गाडा मालक यांचे नांव देणेबाबत. मा.श्रध्दा लांडे, मा.शुभांगी लोंढे यांचे पत्र
विषय क्रमांक ५) प्रभाग क्र.७ च-होली गावठाणातील शाळा क्र. २० चे नांव बदलाबाबत. मा. नितीन प्रताप काळजे, मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र
विषय क्रमांक ६) लांडेवाडीप्रभाग क्र.३६ येथील दत्तमंदीर – बाबर पेट्रोल पंप –आशिर्वाद गॅस एजन्सी चौक- दत्त मंदीर या मार्गावर जॉगींग ट्रॅक तयार करणे बाबत. मा. विश्वनाथ लांडे यांचे पत्र.

------

दिनांक १५/११/२०१४ रोजी दुपारी – २.४५वा. (कार्यपत्रिका क्र.७) व दिनांक १५/११/२०१४ रोजी दुपारी – ३.०० वा (कार्यपत्रिका क्र.८) झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- १२ विषय क्रमांक- १
दिनांक- ०३/१२/२०१४ विभाग- इ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन
सूचक- मा.संजय वाबळे अनुमोदक- मा.Adv.नितीन लांडगे
संदर्भ- क्र.इक्षेका/०४/कावि /५५४/२०१४, दिनांक २४/११/२०१४

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील क्र.इक्षेका/०४/कावि/५५४/ २०१४ दिनांक २४/११/२०१४ चे पत्र मा.खासदार श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी १३/०६/२०१४ रोजी मा.श्री. पृथ्वीराज चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भोसरी गावाचे भोजापूर असे नामकरण करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश पिंपरी चिंचवड महानगरपालिका व संबंधित यंत्रणेला दयावेत अशी विनंती केली आहे. नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. पीसीसी – ३०१४/ सं.क्र.७२६/ नवि – २२ दिनांक १७ सप्टेंबर २०१४ अन्वये मा.खासदार यांच्या विनंती अर्जाचे अनुषंगाने उचित कार्यवाही करुन त्याबाबत संबंधितास कळविणेत यावे असे कळविले आहे. मा.नगर विकास विभागाकडील पत्राचे अवलोकन करणेबाबत.

विषय क्र.१ सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक- २
दिनांक- ०३/१२/२०१४ विभाग- इ क्षेत्रीय कार्या.प्रशासन
सूचक- मा.संजय वाबळे अनुमोदक- मा.शुभांगी लोंढे
संदर्भ- क्र.इक्षेका/०३/काविं /५२९/२०१४, दिनांक २४/११/२०१४.

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. ६,७ व २९ ते ३६ असे एकूण १० प्रभागाचा समावेश आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९ सप्टेंबर २०१३च्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात् राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करणेच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संबंधी आदेश दिलेले आहेत.त्याप्रमाणे केंद्रशासन राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संदर्भात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.राकेधो/२०१३/पक्र.३९/नवि/ ३४२९/ १०/२०१३ अन्वये कळविले आहे. मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त प्रभागामध्ये हॉकर्स झोन निश्चित केले आहे. मा.सहा.आयुक्त, भूमि आणि जिंदगी विभाग यांचेकडील जा.क्र. भुजि/१/कावि/ २९३/ २०१४ दिनांक १७/११/२०१४ अन्वये झोन निश्चिती संदर्भात मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेबाबत कळविले आहे. इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रस्तावित हॉकर्स झोन निश्चितीस मान्यता देणेबाबत.

हॉकर्स झोन निश्चितीबाबत केंदशासनाचे धोरण आहे तर त्याबाबत नियम व अटी शर्ती काय आहेत याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक-१४ विषय क्रमांक- १
दिनांक- ०३/१२/२०१४ विभाग- इ क्षेत्रीय कार्या. प्रशासन
सूचक-मा.श्रध्दा लांडे अनुमोदक-मा.शुभांगी लोंढे
संदर्भ- क्र.इक्षेका/प्रशा/५/कावि/१०१/२०१४, दि.०२/१२/२०१४

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रशासन विभागामध्ये सन २०१४ -२०१५ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये प्रशासन विभागातील १. वाहन इंधन या लेखाशीर्षावर र रू २,००,०००/- २. इतर खर्च – र रु. १,००,०००/- ३.सार्वजनिक वाचनालय वृत्तपत्रे बीले र रु. ४,५०,०००/- याप्रमाणे तरतूद करणेत आलेली होती. सदरची तरतूद अपुरी पडली आहे.

सबब, कर्मचा-याचे बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर रक्क्म रुपये १८,००,०००/- तरतुद करण्यात आली होती. सदर तरतुद मधील २०१४-२०१५ बोनस तथा सानुग्रह अनुदान करीता र रु १२,३८,८०३/-इतकी खर्च झालेली असुन र रु ५,६१,१९७/- तरतुद शिल्लक आहे.त्या तरतुदीमधून र रु ५,००,०००/- खालील प्रमाणे नमुद केलेल्या लेखाशिर्षावरती वर्ग करणे आवश्यक आहे.,

**१**.इ क्षेत्रीय कार्यालयाचे **वाहन इंधन** या लेखाशिर्षावरती र रु २,००,०००/- तरतुद करण्यात आली होती. सदरचे तरतुदमधून दिनांक १९/११/२०१४ अखेर र. रु. १,८८,६८९/- इतकी खर्च झालेली असुन र. रु. ११,३११/- फक्त तरतुद शिल्लक आहे.तेव्हा पुढील वाहन इंधन खर्चापोटी र रु २,००,०००/- वाहन इंधन या लेखाशिर्षावरती तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे.( इ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रशासन विभाग आरोग्य् विभाग,अतिक्रमण विभाग या विभागांना मे ऍपेस्को पेट्रोल पंप लि यशवंत नगर पिंपरी -१८ यांचेकडून उधारी वरती डिझेल भरुन घेतले जाते त्या अनुज्ञेय रक्कमे पोटी र रु १,००,०००/- अनामत ठेवणेत आलेली आहे) त्यामुळे वाहन इंधना करीता तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे.

२.तसेच सन २०१४-२०१५ करीता **इतर खर्च** या लेखाशिर्षका वरती र रु. १,००,०००/- तरतुद करणेत आलेली होती सदरचे तरतुदी पैकी दिनांक २४/९/२०१४ रोजी र रु. ७६,५२५/- खर्च झालेले असुन र रु. २३,४७५/- इतकी तरतुद शिल्लक आहे. तेव्हा सदरचे लेखाशिर्षाकावरती रक्कम रुपये १,००,०००/- वर्ग करणे आवश्यक आहे.

**३**.तसेच **सार्वजनिक वाचनालय वृत्तपत्रे बीले** या लेखाशिर्षावरती र रु. ४,५०,०००/- इतकी तरतुद होती. दिनांक ३०/१०/२०१४ अखेर पर्यत् रक्क्म रुपये ३,६६,८२८/- इतकी खर्च झाली आहे.व र रु.८३,१७२/- शिल्लक आहेत तेव्हा उर्वरीत कालावधी करीता रक्कम रुपये २,००,०००/- तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त् नमुद केलेप्रमाणे बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षाकावरील सन २०१४-१५ करीता तरतुद शिल्लक र रु ५,६१,१९७/- ( अक्षरी र रु पाच लाख एकसष्ठ हजार एकशे सत्ताण्णव फक्त) व उर्वरीत कालावधीत सदरचे लेखाशिर्षावर खर्च होणेची शक्यता नाही. म्हणून उर्वरीत रकमेपैकी र रु ५,००,०००/- पैकी पुढीलप्रमाणे **१.वाहन इंधन – र रु २,००,०००/- २. इतरखर्च – ररु १,००,०००/-३. वृत्त्पत्रेबिले – ररु. २,००,०००/- यापमाणे रक्कम वर्ग करण्यात यावी.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिंनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरचा विषय मा.प्रभाग समिती पुढे ऐनवेळच्या विषय निर्णयार्थ ठेवणेत यावा. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरचा विषय कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक-१५ विषय क्रमांक- २
दिनांक- ०३/१२/२०१४ विभाग- इ क्षेत्रीय कार्या.स्थापत्य
सूचक-मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ- क्र. इस्था/१/कावि/६२२/ २०१४.दिनांक ०३/१२/२०१४.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील इ स्थापत्य विभागाकडील " स्थायी अस्थापना " या लेखाशिर्षकावर सन २०१४-१५ करीता तरतूद र.रुपये १,२५,००,०००/- करणेत आली होती. दि.२७/११/१४ अखेर र.रु. १,१७,२५,३६६/- असा खर्च झालेला आहे दि. २६/०१/१४ अन्वये नविन दोन प्रभागाची रचना करणेत आलेली असलेने क प्रभागाकडील १० प्रभाग इ क्षेत्रीय कार्यलायाकडे वर्ग करणेत आलेले आहे.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील इ स्थापत्य विभागासाठी " स्थायी अस्थापना " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतूद र.रु.१,२५,००,०००/- इतकी केली असून ती कमी पडत आहे. तरी इ अतिक्रमण विभागाकडील " स्थायी अस्थापना " या लेखाशिर्षकावरील र.रु.१,००,००,०००/-( अक्षरी र.रु. एक कोटी ) रक्कमेमधून र.रु.४०,००,०००/- इतकी रक्कम इ क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाकडील " स्थायी अस्थापना " या लेखाशिर्षावर वर्ग करणेआवश्यक आहे.

तरी इ क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य इ विभागाकडील " स्थायी अस्थापना " या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता तरतूद रु.रु.१,२५,००,०००/- इतकी तरतूद आहे. दि.२७/११/१४ पर्यंत सदर लेखाशिर्षावर र.रु.१,१७,२५,३६६/- खर्च झालेला आहे व उर्वरीत र.रु.७,७४,६३४/- इतकी शिल्लक आहे.सध्यस्थितीत पुढील कालावधीसाठी सदरची रक्कम कमी असलेने इ अतिक्रमण स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील तरतूद र.रु. १,००,००,०००/- मधून र.रु.४०,००,०००/- इतकी वर्ग करणेसमा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रक्कमा नियमानुसार वर्ग करता येत असलेने सदरचा विषय ठेवणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरचा विषय कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- १६ विषय क्रमांक- ३

दिनांक- ०३/१२/२०१४

सूचक-मा.वसंत (नाना) लोंढे अनुमोदक-मा.संजय वाबळे

संदर्भ- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्राथमिक शाळा इंद्रायणीनगर यांचे पत्र

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्राथमिक शाळा इंद्रायणीनगर येथे इयत्ता १ली ते पाचवीची मुले व मुली शाळा सकाळ व दुपार सत्रात भरत असून शि क्षण येणारी जवळपास ४५० वि द्यार्थी असून बालवाडीचे २०० विद्यार्थी येथे शिकत आहे. कर्मचारी संख्या १५ पर्यंत आहे. शाळेला अनेक अडीअडचणींना तोंड दयावे लागत आहे. शाळेने मागील दोन वर्षापासून आपल्या विभागाशी लेखी, तोंडी संपर्क साधला. त्यातून शाळेला दोन वर्ग खोल्या मिळाल्या तसेच दोन संडास देखील बांधली आहेत. परंतू पाण्याचे कनेक्शन नसल्यामुळे त्याचा वापर होत नाही. तरी पाण्याचे कनेक्शन जोडून छतावर सिंटेक्स टाकी बसवली तर पाण्याचा पुरवठा दिवसभर होईल व स्वच्छता राहील. शाळेच्या जवळून नाला व विहिर असल्यामुळे सरपटणा-या प्राण्याचा वापर जास्त आहे. त्यामुळे विद्यार्थी व कर्मचारी यांना धोका संभवतो. त्यामुळे शाळेला सिंमाभिंत घालून मिळावी. जेणेकरुन विद्यार्थी मुक्तपणे शिक्षण होतील. तसेच शाळेला आतून व बाहेरुन रंग देणे गरजेचे आहे. त्यामुळे वातावरण प्रसन्न राहील. वर्गाच्या खिडक्या व दारे तुटलेली आहेत. जुने दरवाजे काढून नवीन दरवाजे बसविण्यात यावेत. व ऑफि सला लोखंडी चॅनेल गेट बसवून मिळावे जेणेकरुन शालेय रेकॉर्ड सुरक्षीत राहील. त्याचप्रमाणे शाळेच्या समोर पावसाळयात खूप पाणी साठते. त्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी उतार देवून पेव्हींग ब्लॉक असवून मिळावेत. तसेच विद्यार्थ्यांन, वि द्यार्थीनींना एक-एक मुतारी अपलब्ध आहे. परंतू त्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी पाईप नसल्यामुळे त्या ठिकाणी खूप दुर्गंधी येते त्यामुळे पाईप टाकून पाणी जाण्यासाठी योग्य उतार देणेत यावा. तरी वरील भौकि सुविधा शाळेस उपलब्ध करुन दयाव्यात जेणेकरुन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होईल. व बौध्दीक दर्जा उंचावण्यास मदत होईल. तरी वरील भौतिक सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक-१७ विषय क्रमांक- ४

दिनांक- ०३/१२/२०१४

सूचक-मा.श्रध्दा लांडे अनुमोदक-मा.शुभांगी लोंढे

संदर्भ- मा.श्रध्दा लांडे, मा.शुभांगी लोंढे यांचे पत्र.

भोसरीगांव येथील गावजत्रा मैदाना शेजारी असणारा बैलगाडा शर्यत घाटास भोसरी गावातील प्र सिध्द गाडा मालक कै. ज्ञानोबा सदाशिव लांडगे यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक-१८ विषय क्रमांक- ५

दिनांक- ०३/१२/२०१४

सूचक-मा.नितीन प्रताप काळजे अनुमोदक-मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

संदर्भ- मा नितीन प्रताप काळजे मा.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपाल केच्या कार्य क्षेत्रात येणा-या प्रभाग क्र. ७ च-होली गावठाणातील विद्यानिकेतन प्राथमिक शाळा क्र. २० रामचंद्र गणपत खेडेकर च-होली गावठाण पुणे ३९ या शाळेचे पुर्वीचे नाव पंडीत जवाहरलाल नेहरु असे होते तथापि सदरचे नाव विद्यानिकेतन प्राथमिक शाळा क्र. २० रामचंद्र गणपत खेडेकर असे करण्यात आले होते. प्रभाग क्र.७ च-होली गावठाणातील विद्यानिकेतन प्राथमिक शाळा क्र. २० रामचंद्र गणपत खेडेकर च-होली गावठाण यांचे नाव बदलून पुर्वी प्रमाणेच "**पंडीत जवाहरलाल नेहरु**" असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक-१९ विषय क्रमांक- ६

दिनांक- ०३/१२/२०१४

सूचक-मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.आशा सुपे

संदर्भ- मा.विश्वनाथ विठोबा लांडे यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथे परिसरात रहिवासी, ज्येष्ठ नागरीक तसेच महिला व युवक दत्त मंदीर, आशिर्वाद गॅस एजन्सी परिसर व तसेच पुणे नाशिक महा मार्गाच्या कडेने सकाळी तसेच सायंकाळी जॉगिग तसेच व्यायाम करीत असतात. याठिकाणी व्यायाम करणा-या नागरीकांना दत्त मंदीर- बाबर पेट्रोल पंप- आशिर्वाद गॅस एजन्सी चौक- दत्त मंदीर या परिसरात गोलाकार जॉगिग ट्रॅक तयार केल्यास परिसरातील नागरिकांना सुरक्षेच्या दृष्टीने सोईचे होईल तसेच व्यायाम करणेसाठी चांगल्या प्रकारची सुविधा उपलब्ध होईल. तरी लांडेवाडी प्रभाग क्र. ३६ येथील दत्त मंदीर- बाबर पेट्रोल पंप- आशिर्वाद गॅस एजन्सी चौक- दत्त मंदीर या परिसरात गोलाकार जॉगिग ट्रॅक तयार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सुरेखा शंकर गव्हाणे
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/ ०४/कावि/ /२०१४
दिनांक- /१२/२०१४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
**इ क्षेत्रीय कार्यालय**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.